# पात्रता अर्ज न भरणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया

## शिवाजी विद्यापीठ; १९ सप्टेंबरअखेर मुदत

**डी. आर. पाटील : सकाळ वृत्तसेवा**

सरुड, ता. २४ : कोरोच्या पार्श्वभूमीवर सर्वच शाळा, महाविद्यालये बंद आहेत. मात्र ज्या त्या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाइन, ऑफलाईन प्रवेश नोंदवून घेतले जात आहेत. असे जरी असले तरी पात्रता अर्ज भरल्याशिवाय प्रवेश निश्चित होत नसल्याने महाविद्यालये बंद आहेत म्हणून निर्धास्त असलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची भीती आहे. तेव्हा वेळेत पात्रता अर्ज भरणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाने एक परिपत्रक काढले असून यानुसार १९ सप्टेंबरअखेर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नियमित शुल्क भरून पात्रता करणे आवश्यक आहे. तरच आपला प्रवेश घेतलेल्या वर्गाचा प्रवेश निश्चित होईल अन्यथा परीक्षेला बसण्यास परवानगी मिळत नाही व प्रवेशही ग्राह्य धरला जाणार नाही.

**विद्यार्थ्यांनी वेळेत पात्रता अर्ज भरणे गरजेचे आहे. महाविद्यालयात नियमित विद्यार्थी येत नसल्याने दुर्लक्ष होणार असल्याने विद्यार्थ्यांनी सजग राहून पात्रता करावी; अन्यथा याला विद्यापीठ अथवा संबंधित महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.**

**- प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील,**
विद्या परिषद सदस्य, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

मुदतीनंतर शुल्क जमा केल्यास दंडासहीत पात्रता करावी लागेल. पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित शुल्क ७५ रुपये, विलंब शुल्क ५० रुपये तर विशेष विलंब शुल्क २००रुपये आहे. त्याचबरोबर नेहमीत शुल्क भरण्याची मुदत १ ते १९ सप्टेंबर, विलंब शुल्क भरण्याची मुदत २० ते ३० सप्टेंबर आणि विशेष विलंब शुल्क भरण्याची मुदत १ ते ७ ऑक्टोबर अशी आहे.